■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष - ०२ ■ अंक - २९६ ■ सोमवार दि.१४ जुलै २०२५ ■ आरएनआय - एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४
■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 296 ■ Monday Dt.14 July 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

# सामाजिक न्यायाचा झेंडा हाती घेऊन आ.अमित गोरखेंचा परखड आवाज बुलंद!

# जेव्हा अमित गोरखेंना एखादा मंत्री, आमदार सभापती महोदय म्हणून संबोधतो तेव्हा समाजाची मान अभिमानाने उंचावते!

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564

## खुर्चीपेक्षा न्याय महत्त्वाचा आ. अमित गोरखे यांची भूमिका अठरापगड जातींच्या लोकांसाठी

# महाराष्ट्रात भाजपाने आ.अमित गोरखे यांच्या रूपाने मातंग समाजाला भरभरून प्रेम दिले!

## आ.अमित गोरखेंना महामंडळाचे अध्यक्ष पद, विधानपरिषदेवर आमदार ते तालिका सभापती आता एकदा नामदार

बीड । प्रतिनिधी

सामाजिक समतेचा झेंडा खांद्यावर घेऊन संघर्ष करणाऱ्या लोकप्रतिनिधींपैकी आमदार अमित गोरखे हे एक आगळंवेगळं व्यक्तिमत्त्व म्हणून राज्याच्या राजकारणात ओळखले जात आहेत. समाजातील वंचित, उपेक्षित घटकांसाठी थेट आणि परखड भूमिका घेणाऱ्या गोरखे यांचा आवाज म्हणजे अनेकांच्या आशेचा किरण ठरतोय. गोरखेंनी केवळ राजकीय व्यासपीठावरच नव्हे, तर रस्त्यावर उतरूनही अनेकदा अन्यायाविरोधात भूमिका घेतली आहे. सामाजिक न्याय मिळावा, जाती-पातीच्या आधारे कोणीही दुर्लक्षित होऊ नये, यासाठी त्यांचा झगडा सुरूच आहे. शिक्षण, रोजगार, आणि आरक्षण यांसारख्या विषयांवर त्यांनी वेळोवेळी शासनाचे लक्ष वेधले आहे. ते केवळ भाषणबाजीपुरते मर्यादित राहत नाहीत, तर लोकांच्या अडचणींमध्ये थेट सहभागी होऊन त्या सोडवण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळेच त्यांची ओळख एक परखड, बेधडक आणि सर्वसामान्यांच्या पाठीशी उभा असलेला आमदार अशी निर्माण झाली आहे.

आजच्या राजकारणात थेटपणा हरवत असताना आमदार अमित गोरखे हे सामाजिक न्यायासाठी नि:संकोचपणे आवाज उठवणारे नेतृत्व म्हणून पुढे येत आहेत. जनतेच्या हक्कासाठी राजकारण म्हणजे केवळ खुर्चीचा खेळ नसतो, तर तो समाजासाठी लढण्याचा शस्त्र असतो, हे आमदार अमित गोरखे यांनी आपल्या कार्यातून दाखवून दिलं आहे. समाजातील दुर्बल, मागासवर्गीय आणि वंचित घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी कायमच ठाम आणि परखड भूमिका घेतली आहे. अनेकदा विरोधाला सामोरं जावं लागलं तरीही गोरखे आपल्या भूमिकांपासून ढळत नाहीत. विधानसभेत असो किंवा रस्त्यावरचा संघर्ष, ते प्रत्येक व्यासपीठावर गरीब, शोषितांच्या प्रश्नांना वाचा फोडतात. शिक्षण, आरोग्य, आरक्षण, आणि सामाजिक समता यासारख्या विषयांवर त्यांचा आवाज सातत्याने घुमतोय. सामाजिक प्रश्नांवर आंदोलने, निषेध, आणि प्रशासनासमोर ठाम मांडणी हे त्यांच्या राजकीय शैलीचे वैशिष्ट्य आहे. त्यांचा प्रत्येक निर्णय आणि कृती ही सामाजिक न्यायाची मूल्यं टिकवण्यासाठी असते. आमदार गोरखेंची लढवय्यी वृत्ती, स्पष्ट धोरणं आणि जनतेशी असलेली नाळ यामुळेच ते फक्त आमदार नव्हे, तर समाजाच्या न्यायासाठी उभा असलेला योद्धा मानले जात आहेत. सामाजिक न्याय या मूल्याला कृतीत उतरवण्यासाठी आणि अनुसूचित जाती-जमातींच्या प्रश्नांना विधायक वळण देण्यासाठी ज्यांनी जनमानसाशी थेट संवाद ठेवला, अशा आमदार अमित गोरखे यांना २०२५ सालच्या पावसाळी अधिवेशनात विधान परिषदेचे तालिका सभापती म्हणून पहिल्यांदाच कामकाज पाहण्याची संधी मिळाली. या विशेष अनुभवाबरोबरच त्यांनी 'सरकारची भूमिका', 'उपवर्गीकरणाचा मुद्दा', 'अस्पृश्यतेचे प्रश्न', 'धर्मांतरविरोधी धोरण' आणि 'महाराष्ट्र जनसुरक्षा कायदा' यांसारख्या संवेदनशील विषयांवर अत्यंत स्पष्ट आणि ठाम भूमिका मांडली.



### आ. अमित गोरखे मातंग समाजातील यशस्वी नेतृत्व

भाजपाने आणि राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून आता मातंग समाजाला अमित गोरखे यांना आमदार केल्यानंतर आता एकदा आमदार ऐवजी नामदार करावे अशी समाज बांधवांना मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडून आशा आहे. मातंग समाजातील एकमेव नेतृत्व हे अमित गोरखे यशस्वी वाटचाल करीत आहेत. जेव्हा तालिका सभापती म्हणून अनेक मंत्री व आमदार यांनी अधिवेशनात सभापती महोदय असं संबोधल्यानंतर समाजाची मान उंचावल्यानंतर समाजात आनंदोत्सव साजरा करण्यात आला. मातंग समाजाचे आमदार अमित गोरखे यांच्या माध्यमातून भाजपाने भरभरून दिले, अण्णाभाऊ साठे महामंडळाचे अध्यक्ष आमदार अमित गोरखेंच्या माध्यमातून मातंग समाजाला भाजपने न्याय दिला. पेपर विक्रेता ते थेट तालिका सभापती असा प्रवास आ. अमित गोरखे यांचा आहे.

# मानवी हक्क अभियानच्या मोर्चाने आज कुणाची जळाली?

## कर्मवीर एकनाथ आव्हाडानी उभा केलेला गायरानधारक हजारोंच्या संख्येने रस्त्यावर डॉ.मिलिंद आवाड हे एक अभ्यासू नेतृत्व मिलिंद आव्हाडांच्या नावाला पसंती



माजलगाव । प्रतिनिधी

कर्मवीर एकनाथ आवाड यांनी मिळवून दिलेल्या गायरान जमीनीच्या न्याय हक्कासाठी हजारोच्या संख्येने माजलगावमध्ये जनसमुदाय उपस्थित रहात डॉक्टर मिलिंद दाभाडे यांच्या नेतृत्वाखाली आजही तो एक वाटला आहे. १८ पगड जातीला सोबत घेत डॉ. मिलिंद आव्हाड हे आपलं सामाजिक संघटन उभा करत आहेत. डॉ. मिलिंद आवाड यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या गायरान धारकांच्या मोर्चाच्या लाखोंच्या संख्येने लोक उपस्थित राहिले. यावेळी मात्र आता अनेकांचे धावे दणलेले आहेत. कर्मवीर एकनाथ आव्हाड यांच्या तालमीमध्ये राहून आपल्या स्वत:च्या राजकीय स्वार्थापोटी संघटनेतील नावावरती वळवळ करणाऱ्यांना आता चपराक बसली आहे. मानवी हक्क अभियानचा मोर्चा एवढा विशाल मोर्चा होता की अनेकांच्या या मोर्चामुळे उंचावले आहेत.

यावेळी मात्र बीड जिल्ह्यातून जनता जाण्यापेक्षा फक्त माजलगाव मतदार संघातून हजरोच्या संख्येने जनता उभा राहिली. या जनतेसाठी गायरान धारक मोठ्या संख्येने उभा राहत असताना

पान २ वर

### जिजांनी उभारलेला गायरान जमीनीचा लढा आम्ही लढणार

हजारो दिन दलित गोर गरीब ऊसतोड मजूर कष्टकऱ्यांना अठरापगड जातीतील मांग महार ढोर चांभार मराठा वंजारी पारधी भिल्ल समाज बांधवाना स्व. कर्मवीर ॲड. एकनाथ आव्हाड साहेब यांनी मिळून दिली पण ती जमीन आता शासन परत घेण्याच्या मार्गावर आहे त्यामुळे स्वर्गीय एकनाथ आव्हाड यांच्या विचाराचा वारसा जपण्याची गरज आहे आणि आपण सर्वांनी एकत्र येत जिजांनी दिलेला जमिनीचं संरक्षण करण्यासाठी रस्त्यावर उतरणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन मानवी हक्क अभियानचा कार्यकर्ते यांनी केले आहे. माजलगाव तालुक्यातील उपविभागीय कार्यालय या ठिकाणी दि, १४.७.२०२५. वार सोमवार ठीक १२:३० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते माजलगाव उपविभागीय कार्यालय असा मानवी हक्क अभियान च्या वतीने विविध मागण्या घेऊन इशारा मोर्चा संपन्न झाला. यावेळी हजारोच्या संख्येने जनसमुदाय उभा होता त्यामुळे माजलगाव मधील अनेकांच्या डोळ्या त पाणवले असून एकनाथ आव्हाड यांच्या आठवणीला उजळा देत त्या ठिकाणी हा मोर्चा निघाला.

# रुपालीची सासरच्या त्रासाला कंटाळून विवाहितेची आत्महत्या

## १० जणांविरुद्ध सिरसाळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल, दोघे अटक

सिरसाळा । प्रतिनिधी

दि.१३.७.२०२५ रोजी सासरच्या मानसिक, आर्थिक, शारिरीक जाचास कंटाळून विवाहितेने आत्महत्या केल्याची घटना परळी तालुक्यातील डिग्रस येथे घडली आहे. रूपाली श्रीनिवास नाटकर वय ३३ वर्षे असे मयत विवाहितचे नाव आहे. हि घटना १२ जुलै रोजी सकाळी ८ वाजण्याच्या सुमारासरा राहात्या घरात घडली आहे. याप्रकरणी मयताचे वडील दिगंबर श्रीराम कदम वय ५२ वर्षे रा. देऊळगाव गाथा तालुका सेलू जिल्हा परभणी यांच्या फिर्यादीवरून शिरसाळा पोलीस स्टेशन येथे आरोपी सासरे, सासू, नवरा, नणंद व घरातील इतर मंडळी नामे १) श्रीनिवास बालासाहेब नाटकर, २) बालासाहेब कुंडलिकराव नाटकर, २) शामल बालासाहेब नाटकर, ३) सुरमा भागवत नाटकर, ४) शुभांगी, मोनिका, सोनाली, वसंत कुंडलिकराव नाटकर, संगीता वसंत नाटकर सर्व रा. दिग्रस तालुका परळी जिल्हा बीड यांच्याविरुद्ध कलम यांच्याविरुद्ध कलम ८५, १०८, ११५, ३५२, ३५१ (२) ३ (५) बीएनएस नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील आरोपी सांसरे वसंत कुंडलिकराव नाटकर, भागवत बालासाहेब नाटकर रा.डिग्रस यांना अटक करण्यात आली आहे. फिर्यादीत असे म्हटले आहे की, घर खरेदी करता पंधरा लाख रुपयाची मागणी करून फिर्यादीचे मुलीचा शारीरिक मानसिक छळ करून तिची आत्महत्या करण्यास प्रवर्त केले आहे. असल्यामुळे फिर्यादीच्या मुलीने म्हणजे रूपाली हे मेथीचे राहते घरी मौजे दिग्रस येथे अंगावर ज्वलनशील पदार्थ घेऊन पेटवून घेऊन आत्महत्या केली. तिचे मृत्यू वरील आरोपी कारणीभूत झाले आहेत. म्हणून काम नमक प्रमाणे गुन्हा दाखल आहे. आदिक तपाससह पोलीस निरक्षक गोरखनाथ दहिफळे करत आहेत. रूपाली चा अंत्यविधी दिग्रस गावातच झाला.



मयत रूपालीचे अंबाजोगाई शासकीय रुग्णालयात शौउच्चधन नंतर तिचे झाल्या माहेरी देवळगाव गाता येते न घेऊन जाता सासरी दिग्रस येथेच अंत्यविधी करण्यात आला. रूपालीचा अंत्यविधी केवळ माहेरी लोकांनी/ नातेवाईकांनी केला. सासर मंडळीतील नातेवाईक अथवा डिग्रस गावातील नागरिक अंत्यविधीस उपस्थित नव्हते. सगळे गाव भयान शांत होते. अंत्यविधी दरम्यान पोलीस प्रशासन उपस्थित होते.

# माजलगाव धरणाच्या परिसरात काडीवडगावमध्ये ऐतिहासिक बैलगाडा शर्यत

## महाराष्ट्रातून उसळला बैलगाडा प्रेमी, युवकांचे नियोजन परफेक्ट, नियोजनबद्ध कार्यक्रम



वडवणी, बीड । प्रतिनिधी

दि. १३ जुलै रोजी गेल्या पंधरा दिवसापासून जनतेला भुरळ असणारी बळीराजा केशरी बैलगाडा शर्यत अत्यंत जोशपूर्ण आणि उत्साही वातावरणात संपन्न झाली. त्यानिमित्ताने काडीवडगाव शिवारात माजलगाव धरण परिसर माणसांच्या गर्दीने ओसंडून वाहिला. शेकडो स्पर्धक आणि संपूर्ण वडवणी तालुक्यासोबत जिल्हाभरातून हजारोंच्या संख्येने लोकांना प्रेक्षक म्हणून सहभाग नोंदवला. बैलगाडा प्रेमाचा हा अफाट जनसागराने वडवणी तालुक्यात बैलगाडा शर्यतीचा नवा उच्चांक गाठून इतिहासच रचला.

वडवणी तालुक्यातील काडीवडगाव या ठिकाणी आषाढी एकादशीच्या निमित्त दिनांक १३ जुलै रोजी तरुणांच्या आयोजनात बळीराजा केसरी बैलगाडा शर्यत संपन्न झाली. या शर्यतीस पाहण्यासाठी तालुकाभरातील बैलगाडा प्रेमींनी प्रचंड भरभरून प्रतिसाद दिल्याने धरण परिसरात गावच्या जत्रेचे स्वरूप आले होते. सकाळी आठ वाजता या स्पर्धेला मान्यवरांच्या हस्ते बैलगाडा पूजन करून व कृषीसंस्कृतीचा राजा बळीराजास अभिवादन करून सुरुवात करण्यात आली. अगदी थोड्याच दिवसात नियोजन केलेल्या शर्यतीस बैलगाडा स्पर्धकांनी तब्बल शेकडो ने प्रतिसाद दिल्याने सर्वांच्याच भुवया उंचावल्या. परंतू आयोजन कमिटीने या सर्व बाबींचा अंदाजा घेऊनच नियोजन आखले असल्याने काडीवडगाव शर्यतीच्या मैदानापासून, वैधकीय सुविधा, खाण्याचे आणि पिण्याच्या पाण्याचे, गाडी पार्किंगचे चोख नियोजन झाल्याने महाराष्ट्रातील पश्चिम महाराष्ट्रपासून आलेल्या स्पर्धकांनी तोंडभरून कौतुक केले.

या संपूर्ण स्पर्धेत अनेक गोष्टी आकर्षणाचे मुख्य कारण ठरल्या, त्यापैकीच एक म्हणजे संपूर्ण नियोजन हे तरुणांच्या नेतृत्वात होत होते. उगाच म्हणत नाहीत, तरुण एकवटला तर लाथ घालीन तिथे पाणी काढतो. याचीच अनुभूती या स्पर्धेच्या आयोजन कमिटीने करून दिली आहे. कायमच पश्चिम महाराष्ट्राच्या परिघात बंदिस्त होतं असलेली बैलगाडा शर्यत मराठवाड्याच्या बीड जिल्ह्यात वडवणी तालुक्याच्या काडीवडगाव शिवारात अत्यंत पद्धतशीर नियोजनाने, प्रभावी प्रचार आणि प्रसाराने तब्बल दिवसभरात १९-२० हजार लोकांचा सहभाग झाला अशी दैदीप्यमान शर्यत यशस्वी करून दाखवली.

**सोशलमीडिया ने मैदान मारलं**

या शर्यती त बैलगाड्यांच्या अगोदर विजेता ठरली ती सोशल मीडिया. होय या स्पर्धेला अगदी आठ दिवसात प्रत्येक बैलगाडा मालक, स्पर्धक, पंचक्रोशीतील सर्वसामान्य शेतकरी, शेतमजूर, युवक विद्यार्थी यांच्यापासून ते विविध राजकीय पक्षाचे पुढारी या सर्वांपर्यंत या स्पर्धेला घेऊन जाण्याचे माध्यम ठरले ते अत्यंत प्रभावी सोशल मीडिया टीम. या स्पर्धेला जणू पंचक्रोशीतील प्रत्येक नागरिकांनी मस्तकावरच घेतले असल्याचे सोशल मीडियाच्या माध्यमातून जाणवले. शेकडो व्हिडिओज पोस्ट आणि मेसेज या स्पर्धेच्या निमित्ताने परिसरातील वेगवेगळ्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर दिसून आले. म्हणून या स्पर्धेच्या प्रसार आणि प्रचाराचे अत्यंत महत्त्वाचे काम सोशल मीडियाने केले असल्याचे दिसून आले

**मैदानाची वाह वा..**

महाराष्ट्रभरातून आलेल्या स्पर्धकांनी अनेक ठिकाणी स्पर्धा केलेल्या असल्याने त्यांच्या अनुभवातील सर्वात मऊ आणि बैलांना धावण्यासाठी पूरक मैदान म्हणून काडीवडगाव येथील या स्पर्धेच्या मैदानाला नवाजण्यात आले. संपूर्ण स्पर्धेत एकही बैलाला कोणतीच इजा न झाल्याने स्पर्धक मैदानावर समाधानी होते.

**डॉ. गिलबिले यांनी पुरवली संजीवनी**

माजलगाव येथील डॉक्टर ज्ञानेश्वर गिलबिले आणि संजीवनी हॉस्पिटलचा स्टाफ डॉ. रहीम शेख यांच्यासह सर्वांनी दिवसभर जखमी झालेल्या स्पर्धाकांना वैधकीय मदत केली. यात दिवसभरात अल्पजखम ११, तर अनेक लोकांना मैदानावरच टाके सुद्धा देऊन उपचार करण्यात आले. शर्यतीत मिरचीत पडलेल्या लक्ष्मणरुपी स्पर्धकांना डॉक्टर गिलबिले यांच्या माध्यमातून जणू संजीवनी देण्यात आली. या वैधकीय मदतीमुळे अनेकांना या नियोजनाचा मोह पडला.

**आयोजकांचे तंतोतंत नियोजन**

आयोजकांनी शर्यतीसाठी लागणाऱ्या प्रत्येक गोष्टीची निवड करताना सर्वांगीण विचार केलेला दिसून आला. मैदान ठरवण्यासाठी गाळाच्या जमिनीचा वापर करण्यात आला. त्यामुळे मैदान स्पर्धकांसाठी जिव्हाळ्याचा विषय ठरला. त्याचबरोबर मैदानाच्या अवतीभोवती असलेल्या शेतकऱ्यांना काडीचा देखील त्रास होऊ दिला नाही. आलेल्या सर्व स्पर्धकांना कुठलाही राग वैताग आक्रळ-तांडव न करता दिलखुलास भाषेमध्ये सूचना देऊन शिस्तीत ठेवण्याचा पूर्ण यशस्वी प्रयत्न केला. अत्यंत उल्हास यांनी उत्साही असलेल्या तरुण प्रेक्षकांना देखील कायम भान जागृत ठेवण्याचे अद्वितीय काम या आयोजन कमिटीने केले.

**जुन्या दिवसांची झाली आठवण**

या स्पर्धेच्या अलोट जनसागर असलेल्या एकूण प्रेक्षकांमध्ये पन्नाशी पार केलेल्या जाणत्या मंडळींचा सहभाग वाखाण्याजोगा होता. ज्या पिढीने दावणीचा बैल हटवला नाही. खंड्याची खंड्या जनवार यांच्या दावणीला जगवली गेली. त्या पिढीचा हल्लीच्या बदलत्या काळात यांत्रिकीकरणाने बैलजोड्यांशी तुटत चाललेला सांधा जोडण्याचं काम या शर्यतीच्या माध्यमातून झाले असावे याच भावनेने ही पन्नाशी उलटलेली अनेक धोतर टोप्यातली जाणतीमंडळी दिवसभर मैदान राखून राहिले.

**बाजाराला किक बसण्याची शक्यता**

गेल्या अनेक दिवसापासून वडवणी तालुक्यातील खंडित झालेले बैल बाजार या अशा स्पर्धा आणि त्याला मिळालेले अफाट प्रतिसादातून आजही इथल्या शेतकऱ्यांची बैल आणि बैल बारदाना याच्याशी असलेली घट्ट वीण कायम असल्याचा पुरावाच देते. आणि म्हणून या स्पर्धेच्या प्रतिसादा नंतर तालुका भरात पुन्हा एकदा बैल बाजार सुरू होण्याची चर्चा रंगू लागली आहे. दिवसभर हजारोंच्या संख्येने आलेल्या विविध क्षेत्रातील मान्यवर तथा प्रेक्षकांनी स्पर्धक यांच्या संपूर्ण इच्छा पुरेपूर भागवण्याचे काम आयोजन कमिटीने केले. एवढ्या अफाट संख्येमध्ये दिवसभरामध्ये कोणताच वाद घडून न देण्याचे आश्चर्यकारक काम आयोजन कमिटीच्या अत्यंत नियोजनानेच शक्य झाल्याचे दिसून येत आहे. एका शर्यतीने तालुका भरातील वातावरण पुन्हा कृषी संस्कृतीतील महत्त्वाचा घटक असलेल्या शेतकरी-बैलगाडा-शेती-माती आणि जोश या सर्व बाबींना पुनर्जन्म दिल्याचे जाणवत आहे.

या शर्यतीचा दिवसभर अत्यंत चुरशीचा सामना लढून दिवसभरात एकूण २४५ नोंदणी बैल जोड्या मैदानात ओपन १७ आणि आदत १८ असे एकूण ३५ राऊंड धावले. यामध्ये ५६ राऊंड सेमीसाठी झाले. यापैकी नऊ बैल जोड्या विजेत्या ठरल्या. मनोज संजय पवार वाघोरा यांचा बादशहा पारेगाव सरपंच देवेंद्र कृष्ण राठोड यांचा लखन, श्रीराम मदंगे शिवा फॅन्स क्लब यांचा दूर्वा अक्रोद भाई जालना यांचा पुण्या, आमदार विलास भुमरे यांचा कॅप्टन आणि गणा शेठ. अनिल चव्हाण जामवाडी तांडा यांचा रॉकेट प्रेमसिंग चव्हाण यांचा लक्षा पैठण छत्रपती संभाजीनगर, राहुल जिंदाल हदगाव यांचा सर्जा सखाराम सुरवसे देवगाव यांचा मल्हार, जगदीश काका फरताडे यांचा कॉकटेल आणि रामा शेठ, कानपूरकरांचा घरचा साज मल्हार आणि छत्रपती, गणेश दसपुते यांचा खंड्या तुकाराम आगलावे यांचा गणा शेठ, मजीद पठाण व मुजीब पठाण यांचा बक्या डॉन असलम पठाण फायर ग्रुप तुर्काबाद यांचा डीजे. या सर्व विजेत्यांना संध्याकाळी ७:३० च्या सुमारास बक्षीस वितरण करण्यात येऊन विजयाच्या रक्कम व ढाल देऊन सर्व विजेत्यांचा सन्मान देखील करण्यात आला. या आषाढी वारी निमित्त झालेल्या बळीराजा केशरी बैलगाडा शर्यतीने वडवणी तालुक्याच्या इतिहासात एक प्रचंड मोठी जबरदस्त आठवण निर्माण करून ठेवली आहे. एक ऐतिहासिक दिवस तालुक्याला तसेच जिल्हाभरातून आलेल्या सर्व प्रेक्षकांनाच पाहण्याचा आणि अनुभवण्याचा मौका या पंचक्रोशीतील आयोजन करणाऱ्या तरुणांनी करून उपलब्ध करून दिला. त्याचबरोबर या सर्व उल्हासी तरुणांना पाठबळ म्हणून बक्षीस देण्यासाठी पुढे सरसावलेले सर्व मान्यवरांचे देखील या कमिटीने आभार मानलेच आहे परंतु पंचक्रोशी देखील त्यांच्या कायम ऋणात असल्याचे बोलले जात आहे.

**एकमेका सहाय्य करू अवघे धरू सुपंथ..!**

या तुकोबारायांच्या अभंगाप्रमाणेच आचरण ठेऊन काडीवडगाव परिसरामध्ये हा अनोखा ऐतिहासिक क्षण साजरा झाला. यामध्ये महत्त्वाचा वाटा असलेल्या आयोजन कमिटीमध्ये काडीवडगाव, चिंचवडगाव, विविध वस्त्या, तांडे, देवगाव, ख.लिंबगाव, देवडी, हरिश्चंद्र पिंपरी, खापरवाडी, लऊळ, चिंचाळा, परडी माटेगाव, मोरेवाडी, कुप्पा, उपळी, दुकडेगाव, केंडे पिंपरी, कवडगाव येथील तरुणांना सहभाग होता.

# दांडी बहाद्दर अधिकाऱ्यांमुळे शेतकऱ्यांना त्रास

### मंडल अधिकारी व तलाठी नियुक्त गावात हजर राहत नसल्याने मोठी कोंडी

पात्रुड । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील महसूल विभागातील मंडल अधिकारी व तलाठी नियुक्त गावात हजर राहत नसल्याने शेतकर्यांची मोठी कोंडी होत आहे. शेतकर्यांना आपली कामे सोडून तलाठी कार्यालयासमोर त्यांच्या येण्याची वाट पाहत दिवस काढावा लागत आहे. तरी ही ते न येता दांडी मारत असल्याने या दांडी बहाद्दर कर्मचार्यामुळे शेतकर्यांना नाहक त्रास सोसावा लागत आहे. याकडे तहसीलदार व जिल्हाधिकारी यासह वरिष्ठ लक्ष देणार का? असा संतप्त सवाल माजलगाव तालुक्यातील शेतकर्यांमधून विचारला जात आहे.

सध्या बहुतांश कर्मचारी नियुक्त ठिकाणी न येता बसूनच आपले कामकाज करत आहेत. यामध्ये महसूल खात्याचे कर्मचारी वर्गाचा सर्वात वरती नंबर आहे. गावात शासनाकडून तलाठी व सर्कल यांना नियुक्त गावे देण्यात आली आहेत. त्यांना त्यांची बसण्याची ठिकाणेही दिलेली आहेत. परंतु या सर्व गावात एकाही ठिकाणी शासनाने नेमून दिलेल्या वेळेत दररोज तलाठी किंवा सर्कल हजर नसतात. तलाठी सर्कल यांना शासनाने नियुक्त गावात आपली वेळ ठरवून दिली आहे. त्याप्रमाणे संबंधितांचे वेळापत्रक त्यांच्या नियुक्ती ठिकाणी असणे गरजेचे आहे. परंतु गावात त्यांची कामाची वेळ व कामाचे दर्शनी भागात वेळापत्रक असणे गरजेचे आहे. परंतु असे कोणतीही वेळापत्रक कोणत्याही तलाठी अथवा सर्कल कार्यालयात पहावयास मिळत नाही. त्यामुळे आपल्या कामकाजाला शेतीकामातून वेळ काढून शेतकरी जर महसूल कार्यालयात गेला तर त्या ठिकाणी तलाठी किंवा सर्कल भेटत नाहीत.

परिणामी शेतकर्यांना तलाठी यांच्या आगमनाची वाट पाहत बसावे लागते. तरीही तलाठी येत नसल्याने हाताखालचा कर्मचारी ताठरपणाने वागत शेतकर्यांची आडवणूक करून पिळवणूक करत असतो. आर्थिक त्यामुळे शेतकर्याला आपले काम करून घेण्यासाठी दुसरा पर्याय नसल्याने मागेल तेवढी रक्कम द्यावी लागते. शेतकर्यांना जागेवर व वेळेत सेवा देण्यासाठी ही कार्यालय आहेत. परंतु तालुक्यात मात्र वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी यांचा वचक प्रशासनावर नसल्याने उलटा कारभार सुरू आहे. शासन शेतकर्याच्या दारी असे शासनाचे ब्रीद आहे. परंतु तालुक्यात मात्र शेतकर्यांनी शासन दारी यावे अशी उलटी गंगा वाहत येण्याचा प्रकार सुरू आहे. महसूल प्रशासनातील अधिकार्यांनी एखादा दुसरा दिवस तालुका जिल्हास्तरावर कामकाजात घालवला तर गैर नाही.

# वसंतनगर ग्रामपंचायतच्या महिला सरपंचसह कुटुंबावर प्राणघातक हल्ला; ५ ते ७ जण गंभीर जखमी

### अंबाजोगाई दवाखान्यात उपचार सुरू

### हल्लाखोरावर गुन्हा दाखल करावा : राठोड कुटुंबीयांची मागणी

### सरपंचदाचा राजीनामा का देत नाही म्हणून हल्ला

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

परळी तालुक्यातील लमानतांडा ग्रुप ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या वसंतनगर ग्रामपंचायत महिला सरपंचसह कटूंबावर गावातील १५ ते २० लोकांनी प्राण घातक हल्ला केला आहे. सरपंचदाचा राजीनामा का देत नाही म्हणून हल्ला करण्यात आला आहे. ५ ते ६ जण गंभीर जखमी झाले आहेत. त्यांचावर अंबाजोगाई येथील स्वराती सरकारी दवाखान्यात उपचार सूरू आहेत. हल्लाखोरावर गुन्हा दाखल करावा, अशी मागणी राठोड कुटुंब यांनी केली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, वसंतनगर तांडा येथे रात्री नऊ वाजता माजी सरपंच श्री दत्तात्रय सखाराम राठोड याच्या सांग्यावरून विद्यपानचे महिला सरपंच सौ.शाहूबाई विजय राठोड सरपंच पदाचा राजीनामा का देत नाही म्हणून पूर्ण कुटूंबावर प्राण घातक हला करण्यात आला. गावातील १) रवी रामराव चव्हाण, २)विकास रामराव चव्हाण, ३) अजित बबन चव्हाण, ४) नितीन गजानन उर्फ गजानद चव्हाण, ५) अभिजित बबन चव्हाण आणि इतर पंधरा ते वीस जणांनी मिळून सरपंचसह कुटूंबातील आठ जणांना प्राणघातक हल्ला करून जीवे मारण्याचा प्रयत्न केला याचे मुख्य सूत्रधार हे माजी सरपंच दत्ता सखाराम राठोड हे आहेत, अशी



प्रतिक्रिया देतांना सरपंचपती विजय राठोड यांनी दिली आहे. याबाबत पोलिसात तक्रार दिली असून गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

# परळी तहसीलदाराचा अन्याय, शेतातून काढला अनधिकृत रस्ता

बीड । प्रतिनिधी

हसनाबाद येथील गट क्र. २ व ३ च्या रस्त्याच्या सुनावणी बाबत परळी तहसील कार्यालयातील तहसीलदार शेतातून आपले अधिकाराचा गैरवापर करत अनधिकृत रस्ता काढून देऊ नये. याकरिता आज जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्यात आले.

पुष्पा भीमाशंकर जाधव रा. गोवर्धन (हि) ह. मु. हसनाबाद ता. परळी वैद्यनाथ येथील रहिवाशी असून त्यांनी १जुलै २०२५ रोजी मौजे हसनाबाद येथील गट क्र.२ व ३ च्या रस्त्याच्या सुनावणी बाबत परळी तहसील कार्यालयातील तहसीलदार हे पुष्पा जाधव यांच्या शेतातून अधिकाराचा गैरवापर करत अनधिकृत रस्ता काढून देऊन अन्याय करीत आहेत. त्यांना १३ जुलै २०२५ पर्यंत न्याय देण्यात यावा. नाहीतर त्यांनी आमरण उपोषणास बसणार असल्याचे कळविले होते. त्या अनुषंगाने आज जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषणास बसले आहेत.

पान १ वरून...

### मानवी हक्क अभियानच्या मोर्चाने आज...

आम्हाला कर्मवीर एकनाथ आव्हाड यांनी गायरान जमिनीचा हक्क मिळवून दिला जगण्याचा मार्ग दाखवला आणि संघर्ष कराला शिकवलं. एकनाथ आव्हाड यांच्या नावाने घोषणा देत जनसमुदाय माजलगाव तहसील कार्यालयावरती पोहोचला गायरान धारकांचे अनेक समस्या घेऊन त्या ठिकाणी मात्र एका जातीचा नव्हे तर १८ पगड जातीचा एकनाथ आव्हाड यांनी उभा केलेला हाडामासाचा कार्यकर्ता उभा होता जे कार्यकर्ते डॉ. मिलिंद आव्हाड यांना सोडून गेले त्यांचं करायचं काय खाली मुंडक वर पाय अशा ही घोषणा यावेळी देण्यात आल्या. परंतु त्या ठिकाणी मात्र आता बीड जिल्ह्यामध्ये जर मानवी हक्क अभियान यांची मोठ्या संघटन उभे राहिले तर याला नक्कीच लाखोंचा समुदाय पाहायला मिळेल यांच्या पाठीशी जनसमुदाय उभा होता व आहे हे आता कर्मवीर एकनाथ आव्हाड यांच्या गायन धारकाच्या मोर्चातून दिसून आलेला आहे.

डॉ. मिलिंद आव्हाड यांच्या नेतृत्वाखाली आणि आदेश आणि संबंधित मोर्चा आज तहसील कार्यावरती धडकला परंतु या ठिकाणी आज सुद्धा महाराष्ट्रातून सर्व आजी-माजी पदाधिकारी हे मिलिंद आवाडे यांचे अभिनंदन करत आहे. डॉ. मिलिंद आव्हाड यांच्या पाठीशी खंबीरपणे यावेळेस १८ पगड जात उभा राहताना दिसत आहेत तर डॉ मिलिंद आव्हाड हे भारत देशाच्या सर्वोच्च असलेल्या शिक्षण क्षेत्रामध्ये जीएन यु प्राध्यापक म्हणून त्यांची ओळख आहे ते कर्मवीर एकनाथ आवाड यांचे चिरंजीव जरी असले तरी १८ पगड जातीसाठी प्रत्येक वेळी आपली विचारधारा मानणारा नेतृत्व म्हणून डॉ. मिलिंद आव्हाड यांच्याकडे पाहिले जात आहे.

### बालकांच्या अंर्तमनाचा ठाव घेणारा बालकाव्यसंग्रह

# ‘बालमित्रांची छान छान गाणी’

बालकाव्यसंग्रह परीक्षण / समीक्षण भाग:- १

आदरणीय बालकवीवर्य प्रदिपगुरूजी पिंपळनेरकर यांच्या छान छान गाणी ह्या काव्यसंग्रहाचे परिक्षण करतांना मी कवियत्री विजयश्री, धुळे स्वत:स धन्य समजते.. कारण नवोदित कवियत्री असल्यावर त्यांच्या काव्यसंग्रहाचं परिक्षण माझ्या साठी लहान तोंडी मोठा घास घेण्यासारखं आहे. आदरणीय गुरूजींना विविध सामाजिक संस्थानी जीवनगौरव पुरस्कारसकट विविध पुरस्कांनी गौरविले आहे यातच त्यांच्या सामजिक बांधिलकीचा परिचय होतो.

लहान बालकांवर संस्कार करत असताना गुरूजी त्यांच्यात लहान होवून समरस झाल्याचा प्रत्यय त्यांच्या कविता वाचल्यावर येतो. पुस्तकाच्या मुखपृष्ठावर कासव, मोर, वाघ, सिंह, हत्तीचा मुखवटा लावलेली मानवी आकृतीने बालमनाला भावेल असच साजेसं हे पुस्तक आहे. वडिलांचा फोटो त्यांच्यातल्या पितृभक्तीची ओळख करून देतात. बालकवितांचा अभ्यास करताना त्यांची बालमनावर संस्कार करण्याची तळमळ दिसून येते. पूर्वीच्या पिढीतील खेळांची ओळख करून देत नविन बैठे खेळ मोबाईल गेम्सवरही आधुनिक काव्य लिहिताना त्यांची काळासोबतची सजगता लक्षात येते. समाजातील सर्व कामे करणाऱ्या मंडळी अन आधुनिक रोबोटही मुलांना काव्यातून ओळख करुन दिलेला आहे.



नविन पिढितील चिमुकल्यांना आज दूरावलेलं संस्कारी आजीचं घर, ड्रोन अन मोबाईलने आज सानथोरांचं व्यापलेलं विश्व बाहूली, प्राणी, पक्षी, वर्तमानपत्रे, तारे आठवड्यातील वारांची वारी, मेट्रो अशा विविध विषयांवरील अष्टपैलू लेखन त्यांच्यातील सजग शब्दकुबेराचं दर्शन घडवितो. काळानुरूप जादूई चिराग बालमनाला भावला नाही तर नवल.... आई मला छोटिशी बंदूक देना म्हणणारं बालमन आज जादूई चिराग मागतयं. यातून पिढीतलं अंतर, समस्या कशा बदलल्या आहेत तेही जाणवतं आणि वारीचाही उल्लेख अध्यात्माची रुजुवात बालमनात करतोय आणि साबण साबण म्हणत आदरणीय गुरुजींनी फक्त देह स्वच्छ करणाऱ्या साबणास आणि वाचकास मनाच्या शुद्धतेचं, स्वच्छतेचं अन निर्मळतेचंही महत्त्व महत्वाचं आहे. कारण मन करा रे प्रसन्न सर्व सिद्धीचे कारण. म्हणून बालमानावर संस्कार करणाऱ्या आणि पिढींमधील जुन्या नव्याचा सुवर्णमध्य साधणाऱ्या कवितांचा हा संग्रह यथोचित चित्रांसह अतिशय सुंदर आहे.

गुरुजींनी मुलांचे मनोरंजन करत ईश्वराशी आपलं नातं आपसूकच जोडलं आहे.

आदरणीय गुरुजींच्या कार्यास नमन आणि खूप खूप शुभेच्छा.. असेच भरभरून कार्य ईश्वर त्यांच्याकडून करून घेवो,.. ही सदिच्छा =ज

१) बालकाव्यसंग्रहाचे नाव:- बालमित्रांची छान छान गाणी
२) कवी:- प्रदिपगुरूजी पिंपळनेरकर ( रमाईसुत)
३) प्रकाशक:- हुदय प्रकाशन पन्हाळा, कोल्हापूर ४) प्रकाशन दिनांक:-९ जुलै २०२५ ५) पृष्ठसंख्या:-१२० ६) किंमत:- १६० ७) कवींचा संपर्क क्रमांक:-९८२३११३५९४

**सौ. विजयश्री, धुळे**
**(नवोदित कवियत्री)**

# पत्नीला व मुलीला वाऱ्यावर सोडून मुकादम पती झाला गायब!

### गेवराई तालुक्यातील पाडळशिंगी येथील घटना; संपूर्ण कुटुंब भयभवीत!

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील पाडळसिंगी येथील विवाहित ऊसतोड मुकादम हे आपल्या पत्नीला व एका मुलीला वा-यावर सोडून घरातून निघून गेले आहे. या प्रकरणी गेवराई पोलिस ठाण्यात हरवल्याची तक्रार कुटुंबियांकडून दाखल करण्यात आती आहे. जवळपास दिड महिना लोटला तरि देखील ऊसतोड मुकादम घरी न आल्याने त्यांचे संपूर्ण कुटुंब सध्या भयभवीत झाले असुन गेवराई पोलिसांनी त्यांचा शोध लावावा यासाठी मुकादमाचे कुटूंब गेवराई पोलिस ठाण्यात हेलपाटे मारत असल्याचे सध्या दिसून येत आहे. दरम्यान पती मुकादम दिड महिन्यापासून घरी आजवर न आल्याने कुटूंबातील इतर मंडळी भवभयीत झाले आहे.



गेवराई तालुक्यातील पाडळसिंगी येथील ऊसतोड मुकादम अनिल आत्माराम धुताडमल (वय ३५) हे दि.२८ मे २०२५ रोजी संध्याकाळी ७च्या सुमारास घरात कुणालाही न सांगता घरातून निघून गेले. ते परत आले नाही. नातेवाईक व त्यांच्या जवळपास सर्वच मित्रांकडे शोध घेतला, मात्र ते आढळून आले नाही. शेवटी दि. १४ जुन रोजी आम्ही गेवराई पोलिस ठाण्यात मुकादम घरातुन निघून गेल्याची मिशिंग तक्रार दाखल केल्याचे पत्नी अनिता धुताडमल यांनी सांगितले. मागिल दिड महिन्यापासून मुकादम अनिल यांचा शोध लागत नसल्याने संपूर्ण धुताडमल कुटूंब भवभयीत झाल्याचे दिसून येत आहे. तक्रार दिल्यानंतर या प्रकरणाचा तपास पो.हे. पिंपळे हे करत आहे. ऊसतोड मुकादम अनिल घुताडमल यांचा गेवराई पोलिसांनी शोध लावावा, यासाठी संपूर्ण भवभयीत झाल्याले कुटूंब हमखास गेवराई पोलिस ठाण्यात हेलपाटे मारत असल्याचे सध्या दिसून येत आहे. दरम्यान पत्नी व मुलीला वा-यावर सोडून गेलेल्या माझ्या पतीचा गेवराई पोलिसांनी शोध घ्यावा अशी मागणी पत्नी सुनिता, मुलगी व संपूर्ण कुटुंबासह नातलगांमधून सध्या होऊ लागली आहे.

# बालवाडीतील विद्यार्थ्यांचा विकास हा त्यांच्या पुढील आयुष्याचा पाया असतो : दीपक तांदळे

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

शहरातील पद्मावती शिक्षण संस्था संचलित, आयोजित पद्मावती विभागात वैद्यनाथ बालक मंदिर, बालवाडी पालक सुसंवाद मेळावा आयोजित करण्यात आला होता. या पालक सुसंवाद मेळाव्याचे अध्यक्ष श्री. कैलास तांदळे सर (अध्यक्ष, पद्मावती शिक्षण संस्था) प्रमुख पाहुणे श्री. दीपक तांदळे सर (सचिव, पद्मावती शिक्षण संस्था) श्रीमती प्रेमिलाताई तांदळे (पद्मावती शिक्षण संस्था सहसचिव), श्री शिवाजीराव आनकाडे सर (मुख्य कार्यकारी अधिकारी) तसेच पर्यवेक्षक श्री. इंगळे सर यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीला उपस्थित मान्यवरांच्या हस्ते क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले व शिक्षणमहर्षी कै.विठ्ठलरावजी तांदळे सर यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले.



श्री दिपक तांदळे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. ते म्हणाले की आम्ही संस्कार प्राथमिक शाळेच्या माध्यमातून परळी तालुक्यातील मुलांना उच्च दर्जाचे शिक्षण देण्याचा प्रयत्न करत आहोत. विद्यार्थ्यांचा बौद्धिक, शारीरिक, मानसिक व भावनिक विकास साधून एक आदर्श, सर्वगुणसंपन्न व संस्कारक्षम विद्यार्थी घडवू. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास करणे व त्यांच्या सुप्त गुणांना वाव देणे हाच संस्कार प्राथमिक शाळेचा ध्यास आहे. बालवाडीतील विद्यार्थ्यांचा विकास हा त्यांच्या पुढील आयुष्याचा पाया असतो या वयात होणारा बौद्धिक शारीरिक आणि मानसिक विकास अत्यंत महत्त्वाचा असतो. या तीनही विकासात्मक पैलू मध्ये संतुलन राखणे बालवाडीतील विद्यार्थ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. शिक्षण हे केवळ पुस्तकी नसावे तर खेळ कला संगीत आणि दैनंदिन अनुभवातून मुलांचा सर्वांगीण विकास साधायला हवा. शारीरिक आरोग्यासाठी स्वच्छतेच्या सवयी लावणे महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन यावेळी त्यांनी केले. पालक सुसंवाद मेळाव्याला उपस्थित पालकांनी शाळेविषयी आपले मत व्यक्त केले, त्यामध्ये श्रीमती उंबरे ताई यांनी आपल्या मनोगतांमध्ये आणि शाळेचे नियोजनाबद्दल कौतुक केले.

तसेच श्री बेंडे सर यांनी आपल्या मनोगतामध्ये या शाळेमध्ये शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच संस्कृतीचं जतन केलं जातं व शाळेमध्ये संस्काराचे धडे दिले जातात असं आपल्या मनोगतामध्ये व्यक्त केले. श्रीमती घायाळ मॅडम यांनी आपल्या मनोगतामध्ये संस्कार शाळा ही परळी तालुक्यातील एकमेव शाळा आहे व वैजनाथ बालक मंदिर आहे जी विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी प्रयत्न करते. ही एक आदर्श शाळेचे पहिले पाऊल म्हणजेच वैजनाथ बालक मंदिर आहे बालवाडी आहे. आमचा पाल्य वैद्यनाथ बालक मंदिर मध्ये शिकतोय ही आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे. ही बालवाडी आमच्या पाल्यांना शिस्तप्रिय व आदर्श घडवत आहेत. वैजनाथ बालक मंदिर विद्यार्थ्यांना संस्कारक्षम घडवत आहे. त्यांच्यातील सुप्त कलागुणांना नेहमी वाव देत असते.तसेच पालकांनी बालवाडी वर्गासाठी दिलेले अभ्यासक्रमाची पुस्तक, शालेय शिस्त आहाराविषयी जागरूकता, नियमित गृहपाठाचे नियोजनया विषयी शाळेचे खूप कौतुक केले.

या कार्यक्रमा मध्ये या कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रीमती सावंत मॅडम यांनी केले, सहशालेय उपक्रम व भौतिक सुविधा विषयी माहिती श्री उरगुंडे सर यांनी दिली तर वैजनाथ बालक मंदिरात विद्यार्थ्यांना बालवाडीसाठी दिलेली पुस्तकाबद्दल श्री पालेवाड सर यांनी माहिती दिली तर सकस आहाराबद्दल श्री पवार सर यांनी माहिती दिली. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित सर्व पालकांसाठी आल्पोपहारची व्यवस्था करण्यात आली होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती रावळ मॅडम तर आभार श्रीमती साळुंखे मॅडम यांनी मानले शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी आदींची उपस्थिती होती.



## चाकरवाडी येथील महिना वारी मध्ये प्लास्टिक मुक्ती व्हावी याकरिता कापडी पिशव्यांचे वाटप

### श्री क्षेत्र चाकरवाडी येथे ह.भ.प महादेव महाराज यांच्या हस्ते वृक्षारोपण करून ना पंकजाताईंना दीर्घायुष्य मिळो ही प्रार्थना माऊली चरणी केली : गणेश लांडे

बीड । प्रतिनिधी

राज्याच्या पर्यावरण व हवामान बदल मंत्री नामदार पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त भाजपाचे युवा नेते गणेश लांडे यांच्या मार्फत सेवा पंधरवडा साजरा केला जात आहे. यामध्ये त्यांनी दिनांक १४ रोजी श्रीक्षेत्र चाकरवाडी येथील माऊली मंदिर प्रांगणामध्ये ह भ प श्री महादेव महाराज यांच्या हस्ते वृक्षांची लागवड करून नामदार पंकजाताई यांना दीर्घायुष्य मिळो ही मनोकामना माऊली चरणी व्यक्त केली आहे.

येणाऱ्या काळामध्ये भावीक भक्तांना सावलीची व्यवस्था व्हावी व प्रचंड प्रमाणामध्ये होत असलेल्या वृक्षतोडीमुळे निसर्गाचा बिघडत चाललेला समतोल राखला जावा ही भावना मनात ठेऊन श्री गणेश लांडे यांनी चाकरवाडी या ठिकाणी शेवा पंधरवडा निमित्त वृक्ष लागवड केली आहे. तसेच या ठिकाणी प्रत्येक महिन्याला महिनावारी भरत असते. यावेळी राज्याच्या कानाकोपऱ्यातून भाविक भक्त माऊली महाराज यांच्या दर्शनासाठी चाकवाडीला येत असतात. यावेळी वारीमध्ये प्रचंड प्रमाणामध्ये प्लास्टिकचा वापर होतो. हे देखील पर्यावरणास हानिकारक असल्यामुळे श्री गणेश लांडे यांनी कापडी पिशव्यांचे वाटप करून प्लास्टिक मुक्त वारी व्हावी याकरिता सेवा पंधरवड्याच्या सहाव्या दिवशी हा उपक्रम राबवल्याचे त्यांनी प्रसिद्ध पत्रकार द्वारे कळवले आहे. या वृक्ष लागवडी प्रसंगी ह भ प महादेव महाराज व चाकरवाडीचे उपसरपंच लक्ष्मण आनवने, भाजपा युवा नेते हनुमान चालक, प्रशांत वालके, सिद्धेस्वर क्षीरसागर, पंडित लांडे, अशोक माने, सुकदेव शिंदे, शिवा माने, संजय जवादे, काशीनाथ लांडे, बालु महाराज लांडे, गमनदीप वंजारे आदि ग्रामस्त उपस्थित होते.

## संस्कार विद्यालयात पालक मेळावा उत्साहात संपन्न

बीड । प्रतिनिधी

संस्कार विद्यालयात इयत्ता तिसरी चौथी विभागात पालक मेळावा घेण्यात आला. विद्यार्थी केंद्रबिंदू मानून, विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती करण्याच्या दृष्टीने मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी संस्कार प्रबोधिनीचे सचिव ॲड. कालीदासराव थिगळे, उपाध्यक्ष भाऊसाहेब बोबडे, शालेय समितीचे अध्यक्ष डॉ. अनुराग पांगरीकर, ॲड. मिलिंद वाघीरकर, दिलीपजी खिस्ती, मुख्याध्यापिका कुलकर्णी ताई, विभागाचे विभाग प्रमुख गिरी सर उपस्थित होते. कार्यक्रमात वरिष्ठांनी मार्गदर्शन केले. तसेच पालकांनीही आपले मनोगत व्यक्त केले. तसेच मराठी, गणित, इंग्रजी विषय शिक्षकांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास बहुसंख्येने सन्माननीय पालक, सर्व शिक्षक वृंद उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मगर ताई यांनी तर आभारप्रदर्शन सौंदत्तीकर ताई यांनी केले.



## साठे जयंतीच्या अध्यक्षपदी पुरुषोत्तम वीर तर सचिवपदी मिलिंद सरपते यांची निवड

बीड । प्रतिनिधी

बीड शहर वंचित बहुजन आघाडीच्या वतीने साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती उत्सव समितीची स्थापना करण्यात आली असून, शासकीय विश्रामगृह बीड बैठकी वंचित बहुजन आघाडीचे बीड जिल्हा उपाध्यक्ष तथा वीर विधानसभा मतदारसंघाचे उमेदवार पुरुषोत्तम वीर यांची अध्यक्षपदी आणि मिलिंद सरपते यांची सचिवपदी निवड करण्यात आली आहे. सहसचिवपदी संदीप जाधव, कोषाध्यक्षपदी रोहन मगर आणि सदस्य म्हणून आकाश साबळे, युनुस भाई, राजकुमार जोगदंड यांची निवड झाली आहे. पाशा भाई यांना उपाध्यक्ष म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.



बीड जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांच्या अध्यक्षतेखाली आणि शहराध्यक्ष लखन जोगदंड व तालुकाध्यक्ष किरण वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली ही समिती कामकाज करत आहे. या समितीद्वारे वंचित, बहुजन आणि शोषित समाजासाठी योगदान देणाऱ्या अण्णाभाऊ साठेंच्या सामाजिक, साहित्यिक आणि सांस्कृतिक कार्याचा प्रसार करण्यासाठी विविध उपक्रम आयोजित केले जातील.

पुरुषोत्तम वीर यांनी यावेळी सांगितले की, अण्णाभाऊ साठे हे वंचित समाजासाठी आदर्श व्यक्तिमत्व आहेत. त्यांच्या कार्याची जयंती उत्सव समितीद्वारे समाजापर्यंत पोहोचविणे हा आमचा उद्देश आहे. मिलिंद सरपते यांनीही सांगितले की, लोकशाहीर अण्णाभाऊ साठेंच्या अभंगांनी आणि साहित्याने समाजाला एकत्र करण्याचे काम केले आहे. त्यांच्या जयंती उत्सवातून त्यांच्या विचारांचा आणि संदेशाचा प्रसार व्हावा, यासाठी आम्ही कटीबद्ध आहोत.

या उत्सवाद्वारे समाजातील शोषित घटकांना सशक्त करण्यासाठी आणि सामाजिक समरसतेसाठी काम करण्याचा निर्धार समितीने व्यक्त केला आहे. लवकरच या जयंती उत्सवाच्या निमित्ताने विविध सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित होणार आहेत. याप्रसंगी वंचित बहुजन आघाडीचे आजी–माजी पदाधिकारी, कार्यकर्ते, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे प्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आजपासून तीन दिवस नाना महाराज कदम यांचे झी टॉकीजवर कीर्तन

नेकनूर । प्रतिनिधी

बीड जिल्ह्याचे भूमिपुत्र आणि संत बंकटस्वामी महाराज फड परंपरेचे वैभव प्रा.नाना महाराज कदम यांचे झी टॉकीजच्या लोकप्रिय मन मंदिरा गजर भक्तीचा या कार्यक्रमात सलग तीन दिवस कीर्तने होणार आहेत. आजपासून तीन दिवस सायंकाळी ६ ते ७ या वेळेत होणार आहेत. तरी या कीर्तन सोहळ्याचा लाभ घ्यावा असे आवाहन बंकटस्वामी भक्त परिवार यांच्या वतीने करण्यात आले आहे.



झी टॉकीज च्या मन मंदिरा गजर भक्तीचा या कार्यक्रमात महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कीर्तनकार प्राध्यापक नाना महाराज कदम यांचे सुश्राव्य किर्तन आजपासून सलग तीन दिवस होणार आहे. आषाढी एकादशीची वारी संपन्न झाल्यानंतर संपूर्ण महाराष्ट्र भक्तिमय वातावरणात रंगून गेला आहे. यातच किर्तन रंगाच्या माध्यमातून घराघरात भक्तीचा जागर केला जात आहे. झी टॉकीज च्या माध्यमातून संत बंकट स्वामी महाराजांची कीर्तनाची शुद्ध परंपरा या माध्यमातून महाराष्ट्रभर पोहोचणार आहे. तरी या कीर्तन श्रवणाचा सर्व भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन बंकटस्वामी भक्त परिवार यांच्या वतीने करण्यात येत आहे.

## पृथ्वीराज कंगने या मुलाचा वाढदिवस कंधार येथे साजरा

बीड । प्रतिनिधी

नांदेड जिल्ह्यातील कंधार तालुक्यामध्ये अतिशय मोठ्या उत्साहामध्ये आणि धुमधडाकाच्या वातावरणामध्ये चिरंजीव पृथ्वीराज कंगने या मुलाचा वाढदिवस भावी परिचारिका शितल अंभोरे व त्यांच्या मैत्रीण भावी परिचारिका ज्योती मुंडे व त्यांच्या ताई व कंगने परिवारातील सर्व सदस्य यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये सेलिब्रेशन करून पृथ्वीराज या मुलाचा वाढदिवस साजरा करण्यात आला.

भविष्यात नक्कीच पृथ्वीराज चांगल्या प्रकारे शिक्षण घेऊन चांगल्या मोठ्या शहरांमध्ये जाऊन उत्कृष्ट उच्च शिक्षण घेऊन एक महत्त्वाचे मोठे असलेले आयएएस किंवा आयपीएस असे प्रशासनातलं मोठं एक पद भूषवून या पृथ्वीवर आपलं नक्कीच चांगले साम्राज्य निर्माण करेल अशी अपेक्षाही यावेळी वाढदिवसानिमित्त पृथ्वीराज याला शुभेच्छा देताना भावी परिचारिका शितल अंभोरे मॅडम, परिचारिका ज्योती मुंडे मॅडम यांनी व्यक्त केली.



## अतुल गायकवाड यांना समाज क्रांती राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर : शेख युनूस

बीड । प्रतिनिधी

अतुल गायकवाड यांना समाज क्रांती राज्यस्तरीय पुरस्कार २०२५ जाहीर झाला आहे. सामाजिक क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांना हा पुरस्कार बी. एस. एफ बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने जाहीर करण्यात आला आहे. हा पुरस्कार सोहळा अमरावती जिल्ह्यात ऑगस्ट महिन्यात होणार असून चित्रपट क्षेत्रातील प्रसिद्ध अभिनेता, अभिनेत्री, दिग्दर्शक, मॉडेल्स यांची प्रमुख उपस्थिती राहणार असून कला, पत्रकारिता, समाजसेवा, साहित्य, कृषी अशा विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या लोकांना हा समाज क्रांती राज्यस्तरीय पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येत आहे, अशी माहिती संस्थेच्या शितल गजभिये यांनी दिली.



## खडतर प्रवासातून सिरसाळ्याच्या सारिकाने एमपीएससीत मिळवले यश

सिरसाळा । प्रतिनिधी

कितीही प्रतिकूल हालाकिची परिस्थिती असली तरी मेहनत आणि जिद्दी च्या जोरावर यश संपादन करता येते हे सिरसाळ्याच्या सारिका मिरगे ह्यांनी दाखवून दिले आहे. सिरसाळा येथील सारिका ज्ञानोबा मिरगे ह्या युवतीची एमपीएससीच्या परिक्षे मार्फत महसुल सहाय्यक पदी निवड झाली आहे. अंत्यत सामान्य कुटुंबातील सारिका गेल्या काही वर्षां पासुन स्पर्धा परिक्षेची तयारी करत होती.

या पुर्वी अनेक परिक्षा दिल्या मात्र यश मिळाले नाही. सारिका ने प्रयत्न सोडले नाही. आभ्यासात सातत्य ठेवले, लातूर या ठिकाणी क्लासेस व सेल्पस्टडी केली. अखेर प्रयत्नास यश मिळाले नुकत्याच एमपीएससी परिक्षेच्या निकालात सारिका मिरगे झळकल्या सारिका गरीब कुटुंबातील असून अल्प भूधारक आहे. आई, वडिल, यांनी मेहनत करून शिकवले, आई वडिलांच्या मेहनतीचे चिज देखील सारिका ने करुन दाखवले आहे. सारिकाने ने मिळवलेल्या ह्या यशा बद्दल त्याचे मित्र परिवाराच्या वतीने सत्कार करण्यात आला सत्कार करताना अकबर पठाण, आसेफ सय्यद, मस्तान सय्यद, जावेद पठाण आदी उपस्थित होते.





## पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांचे स्वागत

बीड । प्रतिनिधी

श्री गुरु पौर्णिमा निमित्त श्रीक्षेत्र रामतीर्थ मठ या ठिकाणी परमपूज्य योगी दादा महाराज खडकीकर यांच्या समाधी स्थळाचे व भगवान श्री मल्लिकार्जुन महादेवाचे आज दर्शन घेण्याचा योग आला व परमपूज्य दादा महाराज खडकीकर मठाचे उत्तराधिकारी वेदशास्त्र संपन्न आनंद महाराज जोशी खडकीकर यांनी बीड जिल्ह्याचे एलसीबी विभागाचे प्रमुख इंटेलिजन्स पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांचे श्री प्रभू रामचंद्र पावन पदस्पर्शभूमी असलेल्या श्री क्षेत्र रामतीर्थ मठ एमआयडीसी बीड या प्रतिष्ठानच्या वतीने शाल व श्रीफळ देऊन इंटेलिजन्स पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांचे स्वागत करून पुढील उत्कृष्ट पोलीस प्रशासकीय कर्तव्यासाठी श्रीक्षेत्र रामतीर्थ मठाच्या वतीने भरभरून शुभेच्छा व आशीर्वाद या मठाचे उत्तराधिकारी हरिभक्त परायण वेदशास्त्र संपन्न आनंद महाराज जोशी खडकीकर यांनी दिला. यावेळी येथे उपस्थित आवर्जून श्री गुरुदर्शनासाठी श्री भगवान मल्लिकार्जुन महादेवाच्या दर्शनासाठी गुरुपौर्णिमेनिमित्त उपस्थित असलेले बीड जिल्हा सत्र न्यायालयातील नामांकित असलेले व उत्कृष्ट कायदा सल्लागार ॲडव्होकेट गोविंद जी शिराळे पाटील सह बंटेवाड यांच्या समवेत आलेले पोलीस बांधव तसेच उपस्थित असलेले पत्रकार संजय देवा कुलकर्णी कुक्कडगावकर, दैनिक न्याय टाइम्स बीड उपसंपादक तथा संघटक महाराष्ट्र राज्य लोकशाही पत्रकार संघ मुंबई प्रदेश शाखा बीड जिल्हा सह मराठवाड्यातील विविध जिल्ह्यातील सद्गुरु भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कानेश्वर विद्यालय कानडी माळी येथे १९९९–२००० इयत्ता १० वी बॅचचे स्नेहसम्मेलन संपन्न

केज । प्रतिनिधी

वर्षा मागून वर्ष सरत जातात. शिक्षण, करियर, लग्न, नोकरी या साऱ्या धकाधकीच्या जीवनात शाळा कॉलेजमधले वर्गमित्र मैत्रिणी ही अक्षरशः विखुरले जातात. कित्येक वर्ष तर भेटही होत नाही, फोन तर दूरच. कुठे असेल आता तो ? कुठे असेल आता ती? हा प्रश्न सतत मनाला छळत असतो. मात्र काळजामधून आठवणी पुसत नाहीत. मग सोशल मीडियावर शोध सुरू होतो. त्या सर्व बालदोस्तांचा.. आणि भरतो कार्यक्रम गेट–टुगेदरचा..! शाळेतल्या त्या मस्त आठवणी सरांच रागावणं, चिडणं, मारणं, चोरून डबा खाणं आठवतं आणि आठवतात एकमेकांना चिडवायच्या कितीतरी गोष्टी, आणि मग उजाडतो तो गेट–टुगेदरचा दिवस आणि सुरू होते मौज मजा आणि आठवणींची हिरवळ कार्यक्रमाची. आनंदाचे क्षण पुन्हा जगूया जुन्या आठवणींना जावूया शाळेच्या अंगणात फुलवलेली ती मौजमजा आज पुन्हा अनुभवूया चला मित्रांच्या गलक्यात हरवून जाऊया.



आजचा हा गेट–टुगेदरचा दिवस प्रत्येकासाठी खासच असतो, कारण सगळेजण तर भेटणार असतात, पण वर्गातल्या बेंचवर जगलेल्या आठवणी सुद्धा भेटणार असतात.

मांगल्याचा, नवचैतन्याचा आणि केलेल्या आठवणी सुद्धा हा नवचैतन्याचा आणि हर्षाचा प्रकाश आनंद घेऊन आला आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष गरडे सर, मुख्याध्यापक, कानेश्वर विद्यालय, कानडीमाळी यांची उपस्थिती होती. तर यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून शाळेतील ज्येष्ठ शिक्षक गवळी सर, गीते सर, खाडे सर, गिरी सर, मुख्याध्यापक, जि.प.उच्च प्राथमिक शाळा, कानडी माळी, श्रीमती शेळके मॅडम व आदर्श शिक्षक नरहरी काकडे उपस्थित होते. यावेळी मुलांनी शाळेतील त्यांच्या जुन्या आठवणींना उजाळा दिला तसेच त्यांच्या जीवनातील शिक्षकांच्या योगदानायाबद्दल मनोगतही व्यक्त केले. यावेळी सुधीर नाईकनवरे, सुनील राऊत, अनुराधा शिंदे, वंदना शिंदे, महादेव मस्के, विनोद राऊत, जालिंदर राऊत, मनोज काळे, माधव वाघमारे, सोनाजी काकडे यांनी आपल्या मनोगतातून शाळेच्या गुरुजनांच्या प्रति आपली कृतज्ञता व्यक्त केली. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील शिक्षक नरहरी काकडे यांची खूप मदत झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुधीर नाईकनवरे यांनी केले व आभार प्रदर्शन काकडे यांनी केले.

# जनसुरक्षा नव्हे जनमुस्कटदाबी! विधेयकाच्या विरोधात जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाने विधिमंडळ अधिवेशनात मंजूर केलेले जनसुरक्षा विधेयक २०२५ हे लोकशाहीला घातक असून अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा आणणारे आहे, असा आरोप करत आज दि.१४ सोमवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जोरदार निदर्शने करण्यात आली. सामाजिक कार्यकर्ते व माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे जिल्हा प्रचारप्रमुख डॉ. गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन पार पडले. यावेळी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, राज्यपाल पी.सी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्यासाठी मागणीचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांच्या माध्यमातून




सादर करण्यात आले.

निदर्शनात शेख युनुस, सुदाम तांदळे, शिवशर्मा शेलार, शेख मुबीन, शेख मुस्ताक कॉम्रेड.नामदेव चव्हाण, आयटक नेते, माजी सैनिक अशोक येडे बीड जिल्हाध्यक्ष (आप), रामधन जमाले बीड जिल्हाध्यक्ष (इंटक), डी.जी.तांदळे अध्यक्ष किसानसभा महाराष्ट्र राज्य, कॉम्रेड. भाऊराव प्रभाळे, बीड जिल्हा सचिव भारतीय कम्युनिस्ट पक्ष, जगन्नाथ बहीर, मराठवाडा शिक्षक नेते, कॉम्रेड बी.एस. दहिवडे, सखाराम बेगडे बीड जिल्हा सचिव (इंटक), कॉम्रेड. व्ही.एन.सवासे आदी सहभागी होते.

**विधेयकावर ठाम आक्षेप**

डॉ. ढवळे म्हणाले की, हे विधेयक राजकीय हेतूने प्रेरित असून सरकारला जाब विचारणाऱ्या कार्यकर्ते, पत्रकार व संघटनांचे तोंड बंद करण्याचे साधन आहे. संशयावरून कोणालाही अटक, संघटना बेकायदेशीर ठरवणे, मालमत्ता जप्ती, बँक खाती गोठवणे यांसारख्या अमर्याद अधिकारांची तरतूद या विधेयकात आहे. जनसुनावणीशिवाय पारित करण्यात आलेल्या या विधेयकावर १२ हजारांहून अधिक नागरिक व संघटनांनी आक्षेप नोंदवले असून, 'नक्षलवाद' या शब्दाचा स्पष्ट उल्लेख नसतानाही 'कडव्या डाव्या विचारसरणी' या संज्ञेच्या आधारे कार्यकर्त्यांवर कारवाईचा धोका निर्माण झाल्याचे डॉ. ढवळे यांनी सांगितले.

**लोकशाहीच्या रक्षणासाठी मागणी – विधेयक तातडीने रद्द करा**

हे जनसुरक्षा नव्हे तर जनमुस्कटदाबी विधेयक आहे. लोकशाहीत आंदोलन व प्रश्न विचारण्याचा अधिकार मूलभूत आहे. या विधेयकाचा गैरवापर होण्याची शक्यता लक्षात घेता ते तातडीने रद्द करण्यात यावे, अशी ठाम मागणी आंदोलक कार्यकर्त्यांनी केली.

## शिवसेनेची उद्या महत्वपूर्ण आढावा बैठक

बीड । प्रतिनिधी

शिवसेना पक्षप्रमुख तथा माजी मुख्यमंत्री उद्धव बाळासाहेब ठाकरे,



युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांच्या आदेशानुसार व शिवसेना मराठवाडा संपर्क नेते आमदार सुनील प्रभू, विरोधी पक्ष नेते अंबादासजी दानवे, शिवसेना उपनेते मराठवाडा समन्वयक विश्वनाथ नेरुळकर, शिवसेना उपनेत्या सुषमाताई अंधारे यांच्या मार्गदर्शना नुसार संपर्क प्रमुख परशुरामजी जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत जिल्हा शिवसेनेची महत्त्वपूर्ण आढावा बैठक उद्या मंगळवार दि १५ रोजी रोजी जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांच्या नेतृत्वाखाली घेण्यात येणार आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूका, युती –आघाडी– सावतंत्र संदर्भात चर्चा, पक्ष संघटन, पक्ष विचार, पक्ष बांधनी, पक्षातील इतर पदाधिकारी यांच्या रिक्त जागी नव्या नियुक्त्या याविषयी चर्चा करण्यासाठी आयोजित केली आहे. तरी सर्व उपजिल्हाप्रमुख, जिल्हा संघटक, तालुकाप्रमुख, विभागप्रमुख, शहर प्रमुख, शाखाप्रमुख, युवासेना, महिला आघाडी, कामगार सेना, शिव सहकार सेना, वाहतूक सेना, शिक्षक सेना, व शिवसेनेच्या अंगीकृत सर्व संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी उपस्थित रहावे असे आव्हान जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी केले आहे. सदरील बैठक दि १५ मंगळवार रोजी दुपारी १:०० वाजता बसस्थानका मागे असणाऱ्या जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांच्या जनसंपर्क कार्यालयात संपन्न होणार आहे.

## लिंबागणेशमध्ये दुकान फोडले; पाच ते सहा लाखांचा ऐवज चोरीला

नेकनूर । प्रतिनिधी

तालुक्यातील लिंबागणेश करून वायंडिंग वायर, स्क्रॅप यासह एकूण अंदाजे लिंबागणेश येथील अहमदपूर ते अहिल्यानगर ५.५ ते ६ लाख रुपयांचा माल लंपास केल्याचे राष्ट्रीय महामार्गावरील श्रीराम पाठक यांच्या समोर आले. तसेच दुकानातील गल्ला फोडून मालकीच्या शिवम मशीनरी अँड इलेक्ट्रिकल्स या दुकानात बुधवारी रात्री चोरीची घटना घडली.



श्रीराम पाठक हे काल गेवराई येथे नातेवाईकांच्या लग्नास गेल्यामुळे दुकान दिवसभर बंद होते. गुरुवारी सकाळी अशोक वायभट यांनी फोन करून दुकानाचे शटर तुटले असल्याची माहिती पाठक यांना दिली. त्यांनी तात्काळ दुकानात धाव घेतली असता चोरट्यांनी दुकानाचे शटर तोडून आत प्रवेश त्यामधील पाच ते सहा हजार रुपये चोरीला गेल्याची माहिती श्रीराम पाठक यांनी दिली.

घटनेची माहिती मिळताच नेकनूर पोलीस ठाण्याचे पोउनि. अप्पासाहेब रोकडे, पो.विशाल क्षीरसागर तसेच लिंबागणेश पोलीस चौकीचे स.फौ. बाबासाहेब राख, गोविंद बडे यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. या चोरीप्रकरणी सपोनि.चंद्रकांत गोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे.

## जनता दरबारात ऑन दि स्पॉट फैसला ! बाळराजे पवार यांची नागरिकांच्या प्रश्नांवर चर्चा

### नगरपरिषद कार्यालयात जनतेसोबत चर्चा

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई शहरातील नगरपरिषद कार्यालय येथे युवा नेते बाळराजे पवार यांनी जनतेच्या प्रश्नांवर जनता दरबारात प्रश्न ऐकून घेवून तात्काळ संबंधित अधिकार्याकडून त्याबाबत स्पष्टीकरण घेवून ते मार्गी लावण्याचे सक्त आदेश दिले आहेत. समाधानकारक उत्तर न मिळाल्यास अधिकार्याला जागेवरच जाब विचारून ते गांभीर्यताही दाखवत आहेत. त्यामुळे बाळराजे पवार यांनी थेट जनता दरबारात सर्वसामान्याचे प्रश्न आणि अडचणी घेवून येणार्या नागरिकांची संख्या दिवसेंदिवस



वाढती असल्याचे चित्र १४ जुलै सोमवार रोजी पाहायला मिळाले.

संदर्भातच नागरिकांनी आपल्या अडचणी मांडाव्यात असे आवाहन करण्यात आले होते परंतु या जनता दरबारात देखील प्रश्न घेवून येणार्या नागरिकांनी नगरपरिषद कार्यालयाच्या सभागृहात मोठी गर्दी केली होती. यावेळी बाळराजे पवार यांनी नागरिकांचे प्रश्न व अडचणी सविस्तरपणे जाणून घेतल्या. या अडचणी व प्रश्नांची पार्श्वभूमी सबंधित अधिकार्यांकडून जाणून घेवून तक्रारदार व अधिकारी यांच्याशी समोरासमोर चर्चा करून संबंधित प्रश्नांवर जागेवरच तोडगा काढून हे प्रश्न मार्गी लावले आहे. यावेळी विविध प्रशासनाच्या सबंधित ज्या सरकारी कार्यालयांमध्ये नागरिकांचे प्रश्न प्रलंबित आहेत अशा नागरिकांच्या लेखी तक्रारींचे निवारण करण्यात आले. नागरिक त्यांच्या समस्या थेट आपल्या हक्काच्या नेत्यांजवळ मांडून या समस्या त्वरित संबंधित शासकीय अधिकार्यांपुढे जात होत्या.

प्रशासन आणि नागरिकांमधील संवाद सुधारून युवा नेते बाळराजे पवार यांच्या पुढाकारातून समस्यांचे त्वरित निराकरण होवून जागेवरच न्याय मिळत असल्यामुळे प्रश्न घेवून आलेल्या नागरिकांच्या चेहर्यावरील समाधान सुखावणारे होते. यावेळी सर्व माजी नगरसेवक व सदरील कार्यालयाचे कर्मचारी तसेच कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## उर्दु शाळेतील रिक्त पदे भरा, अन्यथा आम्ही जिल्हा परिषदेत शाळा भरवु

बीड । प्रतिनिधी

आज दिनांक १४ जुलै रोजी सप्तरंग सामाजिक प्रतिष्ठान बीड जिल्ह्याच्या



वतीने कार्यकारी अधिकारी व शिक्षण अधिकाऱ्याना जिल्ह्यातील उर्दू शाळेतील असणाऱ्या शिक्षक रिक्त पदे भरण्यात यावी यासाठी निवेदन देण्यात आले. आजघडीला उभ्या जिल्ह्यातील उर्दू शाळेतील मुख्यध्यापक तसेच सहाय्यक शिक्षक पदे रिक्त असल्या कारणाने उर्दू भाषिक विद्यार्थ्यांचे अतोनात नुकसान होत आहे.

लवकरात लवकर शासनाने रिक्त पदे भरण्यात याव्या अन्यथा जिल्हापरिषद बीड येथे आम्ही शाळा भरवू असा कडक इशारा सप्तरंग सामाजिक प्रतिष्ठान बीड जिल्ह्याच्या वतीने देण्यात आले. सोबत सर्व सदस्य उपस्थित होते. सतरंग सामाजिक प्रतिष्ठान बीड जिल्हा केले आहे.

## एकच नारा... सातबारा कोरा, शेतकऱ्यांचा आक्रोश उफाळून आला

### सातबारा कोरा करा, नाहीतर आम्ही रस्त्यावर उतरू : सुनील ठोसर

गेवराई । प्रतिनिधी


महाराष्ट्रातील करोडो शेतकऱ्यांनी सातबारा कोरा करा या मागणीसाठी एकत्र येत शासनाच्या धोरणांवर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.



अनेक वर्षांपासून कर्जाच्या विळख्यात अडकलेल्या शेतकऱ्यांचे जीवन उध्वस्त झाले असून, शेतीतून उत्पन्न नाही, सरकारच्या योजनेचा लाभ नाही आणि कर्जमाफी फक्त घोषणांपुरती मर्यादित असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. शेतकऱ्यांनी आयोजित केलेल्या आंदोलनात महिला, वृद्ध आणि युवक यांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग दिसून आला. शेतकरी नेत्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, सरकारने निवडणुकीपूर्वी ज्या कर्जमाफीच्या गाजराने शेतकऱ्यांना फसवलं, त्याचा आता आम्हाला त्रास होतो आहे. आमची एकच मागणी आहे सातबारा कोरा करा! शासनाच्या दुर्लक्षामुळे नैराश्यग्रस्त झालेल्या शेतकऱ्यांमध्ये आत्महत्यांचे प्रमाण वाढले आहे. अशा स्थितीत, संपूर्णपणे कर्जमुक्तीचा निर्णय घेणे ही काळाची गरज बनली आहे, असे मत विविध शेतकरी संघटनांनी व्यक्त केले आहे. सातबारा कोरा झाल्याशिवाय आम्ही थांबणार नाही, असा निर्धार करत शेतकऱ्यांनी आता निर्णायक लढ्यासाठी सज्ज असल्याचे जाहीर केले आहे.




युवा नेते आकाश भैय्या कडेरे यांना वाढदिवसाच्या सायं. महाराष्ट्र आरंभ कार्यालय शुभेच्छा देताना संपादक दीपक थोरात, भारत आण्णा कांबळे, महाराष्ट्र आधार सेना युवा उपजिल्हाप्रमुख अनिल आवाड.



अजिम पवार गटाच्या राष्ट्रवादी कामगार आघाडीच्या प्रदेश उपाध्यक्षपदी शेख अमर यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा सायंकाळी च्या वतीने कार्यालयात शुभेच्छा देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी संपादक दीपक थोरात, महाराष्ट्र आधार सेना युवा उपजिल्हाप्रमुख अनिल भैय्या आव्हाड.

## शिक्षक सहकारी पतसंस्थेत पदाचा गैरवापर करुन श्रीराम बहिर यांनी मुलाला लावले

### मुलाची नियुक्ती रद्द करुन वेतन व भत्ते वसुल करण्याचे आदेश

बीड । प्रतिनिधी

येथील छत्रपती शिवाजी महाराज शिक्षक सहकारी पतसंस्थेचे चेअरमन श्रीराम बहिर यांनी आपल्या पदाचा गैरवापर करून मुलगा निखील बहिर यालाच वरिष्ठ लिपीक पदावर नियुक्ती दिली होती. या प्रकरणात निखील बहिर यांना दिलेली नियुक्ती ही चुकीची व वरिष्ठ लिपीक पदासाठीची पात्रता विचारात न घेता दिल्याचे निदर्शनास आल्याने सहकारी संस्था उपनिबंधकांनी निखील बहिर यांना वरिष्ठ लिपीक पदावर दिलेली नियुक्तीतात्काळ रद्द करून त्यांना दिलेले वेतन व भत्ते वसुल करण्याचे आदेश दिले आहेत. या आदेशामुळे श्रीराम बहिर यांना मोठी चपराक बसल्याचे दिसून येते.

बीड येथील छत्रपती शिवाजी महाराज शिक्षक सहकारी पतसंस्थेत १ नोव्हेंबर २०२३ रोजीच्या ठराव क्रमांक ११ नुसार संस्थेत वरिष्ठ लिपीक संवर्गाचे पद रिक्त असल्याने सदरील पद भरण्यासाठी अर्ज मागविण्यात आले होते. त्या नुसार संस्थेच्या कार्यालयाकडे एकूण ७ अर्ज प्राप्त झाले होते. अर्जाची छाननी केल्यानं तर अर्जदार बहिर निखील श्रीराम यांची पात्रता गुणानुक्रमे सर्वोत्तम असल्याच्या कारणाने वरिष्ठ लिपीक पदासाठी त्यांची नेमणूक करण्यात यावी व त्यांना दरमहा २५ हजार रुपये एकत्रित पगार देण्यात यावा असा ठराव घेण्यात आला होता. वरिष्ठ लिपीक पदासाठी कोणत्याही शाखेचा पदवीधर, संगणक तसेच सहकार खात्यातील दोन वर्षाचा पुर्वानुभव व सहकार खात्यातील परीक्षा पास झालेला असावा किंवा संस्थेमध्ये कमीत कमी १२ वर्ष सेवा पूर्ण झालेली असावी अशी अट आहे. मात्र निखील श्रीराम बहिर हे १२ वी पास असतांनाही – त्यांना वरिष्ठ लिपीक पदावर नियुक्ती देण्यात आली.

सदरील नियुक्ती होत असतांना निखील बहिर यांचे वडील श्रीराम बहिर हे संस्थेचे चेअरमन होते व आजही आहेत. त्यामुळे ही भरती जाणीवपुर्वक केली असून पद भरतीस संस्थेच्या संचालक मंडळाने देखील मान्यता दिलेली आहे. त्यामध्ये स्पष्टपणे नमूद केलेले आहे की, भविष्यात सदर प्रकरणी काही प्रश्न उद्भवल्यास त्यास संस्था जबाबदार राहील. सदर तारांकित प्रश्न उद्भवल्यानंतर या प्रकरणी संस्थेने दाखल केलेली कागदपत्रे व फाईल यांचे उपनिबंधक सहकारी संस्था यांनी अवलोकन केले असता तत्कालीन प्रभारी उपनिबंधक सहकारी संस्था बीड यांनी दिलेली मंजुरी ही संस्थेच्या कर्मचारी सेवानियमाच्या विरुद्ध असल्याची बाब निदर्शनास आली.

त्यामुळे वरिष्ठ लिपीक निखील बहिर यांना कमी करण्याबाबत महाराष्ट्रसहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७९ (अ) अन्वये निर्देश देणे आवश्यक झाले असल्याची खात्री विद्यमान उपनिबंधकसहकारी संस्था बीड यांना झाली त्यामुळे – उपनिबंधक एस. बी. घोडके यांनी छत्रपती शिवाजी महाराज शिक्षक सहकारी – पतसंस्था बीड या संस्थेने बेकायदेशीरपणे व चेअरमन यांनी आपल्या पदाचा गैरवापर करुन आपला मुलगा निखील श्रीराम बहिर यांना वरिष्ठलिपीक या पदावर दिलेली नियुक्ती तात्काळ रद्द करण्याचे आदेश दिले आहेत. त्याच बरोबर वरिष्ठलिपीकम्हणून निखील बहिर यांना दिलेले वेतन व भत्ते वसुल करावेत असे आदेश देखील उपनिबंधक सहकारी संस्था बीड यांनी दिले आहेत. दरम्यान बहिर यांनी पदाचा गैरवापर करत केलेला प्रकार आता अंगलट आला असून मुलाची नियुक्ती रद्द करण्याचे आदेश उपनिबंधकांनी दिले आहेत.

## यावर्षी वाढदिवस सोहळा साजरा करणार नाही : धनंजय मुंडे

### सहकारी – कार्यकर्त्यांनी बॅनर, जाहिराती ऐवजी सामाजिक उपक्रम राबविण्याचे आवाहन

परळी वैद्यनाथ । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते तथा माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांचा येत्या १५ जुलै रोजी वाढदिवस असून, यावर्षी आपण वाढदिवस साजरा करणार नसून सहकारी व कार्यकर्त्यांनी वाढदिवसाचे सोहळे आयोजित करू नयेत, असे आवाहन धनंजय मुंडे यांनी केले आहे.



धनंजय मुंडे यांचा वाढदिवस हा दरवर्षी चाहते व कार्यकर्त्यांसाठी मोठी पर्वणीच असतो, मात्र यावर्षी मराठवाड्यात बहुतांश भागात पावसाने ओढ दिल्याने शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट आहे, दुसरीकडे नुकतेच जवळचे सहकारी स्व. आर. टी. देशमुख यांचे झालेले निधन आदी बाबींचा विचार करून धनंजय मुंडे यांनी वाढदिवस साजरा करणार नसून, सहकारी – कार्यकर्त्यांनी बॅनर बाजी, जाहिराती आदिंवरील खर्च टाळून त्याऐवजी सामाजिक उपक्रम राबवावेत, असे आवाहन केले आहे.

धनंजय मुंडे यांना काही दिवसांपूर्वी बेल्स पाल्सी या आजाराचे निदान झाले होते. त्यानंतर विविध उपचार घेऊन मुंडेंनी इगतपुरी येथील ध्यान केंद्रात विपश्यना देखील केली. आ. धनंजय मुंडे हे येत्या १५ जुलै रोजी ध्यानसाधना करणार असून, ते वाढदिवसाच्या दिवशी शुभेच्छा स्वीकारण्यास परळी वैद्यनाथ किंवा मुंबई वा अन्य कुठेही उपलब्ध असणार नाहीत, असे त्यांच्या कार्यालयाच्या वतीने कळवण्यात आले आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT